छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक
बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

# मराठवाडा दर्शन

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

Mo.9028349999
E-Mail : marathwadadarshannews@gmail.com
MARATHWADA DARSHAN
संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -२४० | बुधवार दि.१४ मे २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-02 | Issue -240 | WEDNESDAY DT.14 MAY 2025 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

प्रतिनिधी पाहिजेत
" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

# न्यायमूर्ती भूषण गवई आज सरन्यायाधीश पदाची घेणार शपथ; आई कमल यांनी व्यक्त केल्या भावना


अमरावती : सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदावर महाराष्ट्राचे सुपुत्र, अमरावतीकर विराजमान होणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ न्यायमूर्ती भूषण गवई भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून आज देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात शपथ घेणार आहेत. हा क्षण केवळ अमरावतीसाठी नव्हे तर, संपूर्ण महाराष्ट्रासाठी गौरवाचा आहे.

बॅलेट पेपरवर निवडणूक हीच खरी लोकशाही : देशाच्या सरन्यायाधीश पदाची शपथ न्यायाधीश भूषण गवई आज घेणार आहेत. तत्पूर्वी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या आई कमला यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी कमला गवई यांना देशात गाजत असलेल्या ईव्हीम मशीनबाबत प्रश्न विचारला. मी त्याची आई आहे. परंतु, तो त्या खुर्चीत बसल्यावर त्याला योग्य वाटेल तो निर्णय घेईल. मी एक आई म्हणून नव्हे, तर एक सामान्य स्त्री म्हणून बोलत आहे. बॅलेट पेपरवर निवडणूक हीच खरी लोकशाही आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात लोकांनाच केंद्रस्थानी ठेवलं आहे, हे आपण विसरू नये. त्यांच्या या वक्तव्यानंतर देशभरात पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर निवडणुकांचा मुद्दा चर्चेत येण्याची शक्यता आहे.

कुटुंबाची आणि मुलांची जबाबदारी माझ्याकडंच : मी शिक्षिका असल्यामुळं मुलांना घडवण्याची जबाबदारी माझ्यावर अधिक होती. साहेब म्हणजे माझे पती, स्व. दादासाहेब गवई हे समाजकारण आणि राजकारणात व्यस्त होते. त्यामुळं कुटुंबाची आणि मुलांची जबाबदारी माझ्यावरच होती. माझ्या मुलांनी उत्तम माणूस व्हावं, हीच माझी खरी इच्छा होती. त्यांना मी योग्य संस्कार दिले. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदाची संधी मिळत आहे. यातून त्यानं वंचितांना न्याय मिळवून देण्यासोबत समाजाभिमुख व्हावं, अशी भावना न्यायाधीश भूषण गवई यांच्या आई कमला गवई यांनी व्यक्त केली.

माझ्या मुलांनीही समाजासाठी न्यायाचे कार्य करावं : दादासाहेब गवई हे अत्यंत लोकाभिमुख व्यक्तिमत्त्व होते. लोकांमध्ये सहज मिसळणारे होते. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून माझ्या मुलांनीही समाजासाठी न्यायाचं काम करावं, हीच माझी माफक अपेक्षा आहे, अशी भावना कमला गवई यांनी नम्रतेनं व्यक्त केली.





कोण आहेत भूषण गवई : विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी त्यांच्या नावाची शिफारस केली आहे. भूषण गवई हे महाराष्ट्राचे सुपत्र आहेत. न्यायमूर्ती गवई हे मुळचे अमरावतीचे आहेत. त्यांनी ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ या काळात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात Assistant Government Pleader आणि Additional Public Prosecutor या पदावर काम केलं आहे. १७ जानेवारी २००० पासून त्यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिलं. १४ नोव्हेंबर २००३ रोजी न्यायमूर्ती गवई यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीशपदी नेमणूक करण्यात आली. २४ मे २०१९ला त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पदोन्नती मिळाली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना अनेक ऐतिहासिक निकालांच्या खंडपीठात त्यांचा समावेश होता. ५०० आणि १००० रुपयांच्या चलनी नोटा सरकारनं रद्दबातल केल्या होत्या. सरकारचा हा निर्णय कायम ठेवण्याचा निर्णय देणाऱ्या खंडपीठात त्यांचा समावेश होता. बुधवारी कार्यभार स्वीकारल्यानंतर २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भूषण गवई सरन्यायाधीश या पदावर कार्यरत असणार आहेत.

# कानडीमाळीत पोहण्यास गेलेल्या अभियंत्याचा खदानीत बुडून मृत्यू

## अग्निशमन दलाकडून पाणबुड्यामार्फत मृतदेहाचा शोध सुरू



केज /प्रतिनिधी

एका खडी क्रेशरवर सौर ऊर्जा पॅनल बसवण्याच्या कामावर असलेल्या खासगी अभियंत्याचा खदानीच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना केज तालुक्यातील कानडी माळी येथे मंगळवारी दुपारी घडली. दरम्यान, मृतदेहाचा शोध लागला नसून, अग्निशमन दल व खासगी पाणबुड्याद्वारे रात्री उशिरापर्यंत शोधकार्य सुरू होते.

केज येथील बालरोग तज्ज्ञ डॉ. दिनकर राऊत यांच्या कानडीमाळी येथील शिवारात असलेल्या योगिता इको सँड अँड क्रेशर येथे लातूर येथील विश्वजित प्रताप माने यांच्या सिंकसन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या एजन्सीद्वारे सौर ऊर्जा पॅनल बसवण्याचे काम मागील आठवड्यापासून सुरू आहे. या कामावर अभियंता म्हणून सचिन केरबा गोरे (वय २५, रा.अवंतीनगर, बार्शी रोड, लातूर ) आणि त्यांचे आठ साथीदार काम करीत होते. मंगळवारी दुपारी २ वाजेच्या दरम्यान सचिन गोरे व त्यांचे सहकारी सचिन पवार, राहुल होदाडे, ओमकार खोकडे, वैभव माके हे चौघे खडी क्रेशरजवळ असलेल्या खदानीत उतरून पोहत असताना सचिन गोरे हे पाण्यात बुडू लागले. हे लक्षात येताच त्यांच्या साथीदाराने आरडाओरड करून त्यांना वर काढण्याचा प्रयत्न केला, परंतु ते पाण्यात बुडाले. खदान खूप खोल असल्यामुळे ते सापडले नाही. माहिती मिळताच, केजचे सहायक पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांनी घटनास्थळाला भेट दिली. बीडच्या अग्निशमन दलासह खासगी पाणबुड्यामार्फत मृतदेहाचा शोध सुरु आहे.अग्निवीर म्हणून झाली निवड सचिन गोरे यांची अग्निवीर म्हणून देखील निवड झाल्याची माहिती मिळाली असून, त्यांचे प्रशिक्षण होणार होते. मात्र त्यापूर्वीच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

# अंबाजोगाई-लातूर महामार्गावरील दिशा दर्शकावरील रिफ्लक्टर रेडियम बोगस

## अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने रस्त्यावर नवीन रिफ्लेक्टर रेडियम बसवावीत

अंबाजोगाई /प्रतिनिधी

अनेक वस्तू बोगस असल्याचे सर्वांच्याच ऐकीवात आहे. परंतू अंबाजोगाई ते लातूर या महामार्गावरील बर्दापूर फाट्यापर्यंत बसविण्यात आलेले रिफलेक्टर आणि दिशादर्शक फलकावरील रेडीयम हे वाहनांच्या प्रकाशात चमकतच नसल्याने सदरील रिफलेक्टर व रेडीयम बोगस तथा निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास येत आहे.या ठिकाणी नव्याने उत्कृष्ट दर्जाचे रिफलेक्टर रेडीयम बसविण्यात यावेत अशी मागणी नागरिकांकडून व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.



अंबाजोगाई - लातूर हा ५४८ बी महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये जा आहे. महामार्गावरील अंबाजोगाई ते बर्दापूर हे वीस किलोमीटर अंतर अपघात प्रवण क्षेत्र म्हणून ओळखले जाते.कारण हा वीस किलोमीटर रस्ता अरुंद आणि टू लेनचा आहे. चार वर्षाच्या कालावधीत छोटे मोठे अपघात तर नेहमीच झाले मात्र अपघात होऊन पन्नासहून अधिक जणांना जीव गमवावा लागला.करिता नागरिकांनीच फोर लेनची मागणी पुढे आली. त्यासाठी दिल्लीपर्यंत मागणी रेटून धरली. परंतु रस्ता फोर लेन करण्याऐवजी ठिकठिकाणी मोठमोठाले गतिरोधक बसवण्यात आले आहेत. परंतु ते दर्जेदार नसल्याने प्रकाश पडत नाहीत.

कंत्राटदाराने केले रिफ्लेक्टरचे काम निकृष्ट दर्जाचे अपघात होऊ नयेत म्हणून रिफलेक्टर व दिशादर्शक फलक लावण्यात आले.काही म्हणणे वाहनचालकांना रस्ता , वळणे आणि गतिरोधक दिसू लागल्यने वाहन चालविण्यास सोयीचे झाले. मात्र गुत्तेदाराने सदरील बसविण्यात आलेले रिफलेक्टर व दिशादर्शक फलकावरील रेडीयम उत्कृष्ट दर्जाचे न बसविल्याने अक्षरे काही महीण्यात पुसून गेले. तसेच रिफलेक्टर देखील चमकेनासे झाले. निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे यावरून उघडकीस आले आहे. केलेले काम देखील अद्याप अपूर्ण आहे.बहुतांश ठिकाणी हे काम करणे बाकी आहे. त्याचबरोबर रस्त्यावरील लाईटस बंद

# आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांची सुरक्षा पोलिस कमिशनर, एसपी करणार

मुंबई : आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांची सुरक्षा आता स्वतः पोलिस आयुक्त करणार आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे अनुदान बंद केल्याची चर्चा सुरू असताना सुरक्षेचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.

सुरक्षेसाठी विशेष समिती गठीत

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्यासंदर्भात विशेष कक्ष गठीत करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य कक्ष गठीत करण्यात आला आहे. या कक्षाचे प्रमुख पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक राहतील. सोबत जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी आणि महिला बालविकास विभागाचे अधिकारी सदस्य असतील. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त अशा जोडप्यांच्या सुरक्षेचा आढावा दर तीन महिन्यांनी घेणार आहेत.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय

### शासनाचे आदेश काय?

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षेची गरज असेल तर त्यांना तात्काळ सुरक्षा पुरविण्यात यावी.
काही काळ त्यांना राहण्यासाठी सुरक्षागृह ही प्रत्येक जिल्ह्यात तयार करण्यात यावीत.
शासकीय विश्रामगृह असेल तर त्या ठिकाणी व्यवस्था करावी.
जर शासकीय विश्रामगृह नसेल तर भाडेतत्त्वावरती घर खरेदी करून त्यांची व्यवस्था करण्यात यावी.
या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न असेल तर एफआयआर नोंदवून तात्काळ सुरक्षा पुरवली जावी.
या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्यस्तरीय ११२ नंबरची हेल्पलाइन असणार.
या कक्षाच्या संदर्भात दर तीन महिन्यांनी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यासंदर्भात आढावा घेऊन अहवाल तयार करतील.



# अक्षय मुंदडांना शुभेच्छा देण्यासाठी बंगल्यावर तुफान गर्दी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वत:चा वाढदिवस भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर साजरा करण्यास अनुमती दिली नसताना देखील विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी साजरे करून संवेदना जपल्या. हार-तुरे स्विकारले नसले तरी शुभेच्छा देण्यासाठी केज मतदारसंघातुन तथा बीड जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते, मित्र परिवार, हितचिंतक प्रत्यक्ष बंगल्यावर येवुन गेले. एवढेच नव्हे तर सकाळपासून रात्रीपर्यंत तुफान गर्दी जमली होती. ७५ कार्यकर्त्यांनी रक्तदान केले तर पंतप्रधान सहाय्यता निधीला देखील सढळ हस्ते जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी मदत टाकून राष्ट्रीय कार्यात योगदान दिले. दरम्यान सेवाभाव हेच माझे मुळ तत्व असुन गोरगरिबांची सेवा आयुष्यभर करत रहाणार या शब्दांत अक्षय मुंदडा यांनी प्रतिक्रिया दिली. लेकरांचं कौतुक पहाण्यासाठी नंदकिशोर मुंदडा जातीने दिवसभर सभागृहात बसुन होते हे विशेष.

य ा

मतदारसंघात अक्षय मुंदडा यांची विशेष क्रेज तथा सवंग लोकप्रियता किती दांडगी याचा अनुभव वाढदिवसाच्या निमित्ताने आला. खरं तर त्यांनी युद्धजन्य पार्श्वभुमीवर वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले नाही. मात्र जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रम घेतले होते. एकही हार-तुरे घेतला नसला तरी अक्षय मुंदडा मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन शिवाय मधुमेह तपासणी ठेवली होती. त्यात ७५ तरूण कार्यकर्त्यांनी रक्तदान केले तर मधुमेह तपासणीमध्ये ३२ रूग्ण निघाले. केज भाजपाच्या वतीने डॉ.वासुदेव नेहरकर आणि भगवान केदार यांनी अभिनव उपक्रम घेत वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देताना केशर आंबा रोप वाटप कार्यकर्त्यांना केले. शहराच्या बांधकाम व्यवसायातील केएसबील ग्रुपच्या वतीने



आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या कुटुंबाला बियाणे व खताचे पोते स्वत: अक्षय मुंदडा यांच्या उपस्थितीत नगर परिषद सभागृहात वाटप करण्यात आले. वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले नसताना देखील संपुर्ण मतदारसंघातील कानाकोपर्यामधुन सरपंच, चेअरमन, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी अक्षय बंगल्यावर उपस्थित राहिले. पंतप्रधान सहाय्यता निधीला मदत देण्याचे आवाहन केल्यानंतर सभागृहात ठेवलेल्या पेटीत योगदान देण्यासाठी कार्यकर्त्यांच्या रांगा लागल्या. शक्य तेवढे योगदान अनेकांनी पुढे येवुन दिले. एखादा तरूण राजकारणी सामाजिक संवेदना जोपासत जेव्हा राजकारण करतो त्यावेळी समाजातील इतर तरूण देखील आदर्श घेतल्याशिवाय रहात नाहीत. वर्तमान काळात वाढदिवस म्हटलं की हार-तुरे, केक, शाल असं स्वरूप असतं. मात्र या तरूण नेतृत्वाने वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष कृतीतून दाखवुन दिलेला साधेपणा कौतुकाचा विषय ठरला. जीवाभावाचे कार्यकर्ते जेव्हा शुभेच्छा देण्यासाठी येत होते, प्रत्येकाची आस्थेवाईक चौकशी करत थोरामोठ्यांचे आशिर्वाद घेत त्यांनी स्वभावातली नम्रता देखील मनं जिंकुन घेणारीच ठरली. विविध ठिकाणचे कार्यक्रम तथा दिवसभर बंगल्यावर उपस्थित राहिलेल्या लेकराला शुभेच्छा देण्यासाठी येणार्यांची गर्दी पाहुन नंदकिशोर मुंदडा यांना देखील गहिवरून आले. दरम्यान, बंगल्यावर सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र परिवार, हितचिंतक मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेताना दिसले.

मंत्री पंकजाताईकडून शुभेच्छा....

राज्याच्या पर्यावरण, पशु संवर्धन, कॅबीनेट मंत्री ना.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनी भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. जिल्ह्याच्या माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी शिवाय इतर लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या. दरम्यान, ताईसाहेबांच्या शुभेच्छा माझ्यासाठी फार मोठा आशिर्वाद असुन सर्वात अगोदर सकाळी त्यांचा फोन येणे तेच खरे माझे भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. गोरगरिबांची सेवा हीच मला आई-वडिलांची शिकवण तो सेवाभाव आयुष्यभर जपुनच भविष्यात या मतदारसंघाची सेवा करणार, आगामी काळात विकासाचा संकल्प हेच आपले ध्येय रहाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

## शाळेचा शेकडा ९४.३३% टक्के निकाल!

प्रतिनिधी @ बीड







बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने दहावी परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.


या बाबत अधिक माहिती अशी की फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाइन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा शेकडा ९४.३३ टक्के इतका लागला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ५८ परीक्षार्थी परीक्षेस बसले होते. त्या पैकी ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या ५५ पैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामुळे शाळेचा शेकडा ९४.५४% टक्के निकाल लागला आहे. यामध्ये कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर चि. प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि चि. शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.

कु. सपना शिंदे हिने ९०.२० गुण मिळवून चौथा क्रमांक चि. जैद सय्यद ९०.०० गुण घेत पाचवा क्रमांक मिळविला तर कु. शुभांगी सोलनकर हिने ८९.६० गुण घेत सहावा क्रमांक मिळवला आहे. दहावी परीक्षेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा तथा जेष्ठ मार्गदर्शिका सौ. सुदामतीताई वाघ मॅडम, संस्थापक सचिव तथा जेष्ठ मार्ग दर्शक श्री. गोविंदराव वाघ साहेब, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर , सचिव श्री. नामदेवराव वाघ सर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम गणेश श्री गुजर सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, शिदोड येथील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# हुतात्मा पानसरे हायस्कूलची विद्यार्थिनी कु. अन्वी आबासाहेब पाटील तालुक्यात सर्वप्रथम

## हुतात्मा पानसरे हायस्कूलचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश







धर्माबाद( अशोक पडोळे)

मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत हुतात्मा पानसरे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवले. उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वर्षी जोपासली. धर्माबाद तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पाटील अन्वी डॉ. आबासाहेब ९९ टक्के हिने मिळवला आहे. दुसरा बुन्नोड मोहन साईनाथ ९८.४ तिसरा मुंडकर साक्षी बालाजी ९६.४ हिने मिळवला आहे. मार्च २०२५ ला ४३५ विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी ४०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९० टक्क्या पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण विद्यार्थी २७ आहेत. ८० ते ८९ टक्के गुण घेणारे विद्यार्थी ५८ आहेत. ७५ ते ७९ टक्के गुण घेणारे विद्यार्थी ३७ आहेत. प्रथम श्रेणी १४२. द्वितीय श्रेणी १०९. उत्तीर्ण ३३ आहेत. शाळेचा एकूण निकाल----- ९३.३३%-------- लागला असून या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र पाटील बनाळीकर, सचिव एडवोकेट विश्वनाथ पाटील बनाळीकर, संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी व सर्व संचालक मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, उपमुख्याध्यापक आर जी गायकवाड पर्यवेक्षक एम व्ही पुलकंठवार, एन एस जिंदमवार, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# महेक फातिमा शेख शकील यांची उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी

प्रतिनिधी @ बीड

जिल्हा परिषद शिक्षीका ताज आयेशा मॅडम व शेख शकील पटेल यांची कन्या व मिल्लीया ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य रियाज़ अहमद कागज़ी सर यांची नातू आणि मिल्लीया ज्युनिअर कॉलेज बीडची विद्यार्थिनी शेख महेक फातेमा हिने बारावीच्या विज्ञान शाखेच्या परीक्षेत ८२.५० टक्के गुण मिळवून जिल्हास्तरावर आपले नाव उज्वल केले आहे.शेख महेक फातेमाच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे ती केवळ आपले कुटुंबच नव्हे तर संपूर्ण मिल्लीया कॉलेज आणि बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राची शान ठरली आहे. या यशाच्या निमित्ताने मिल्लीया कॉलेजच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात कॉलेजच्या सेक्रेटरी सबिया मॅडम, प्राचार्य डॉ. फैसल चाऊस सर, उपप्राचार्य तसेच डॉ. समीर सर, डॉ. इलियास सर यांच्या हस्ते महेक फातेमा शेख शकील हिचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तिच्या गौरवासाठी कॉलेज आवारात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी टाळयांच्या कडकडाटात स्वागत केले. या प्रसंगी बोलताना प्राचार्यांनी सांगितले की, शेख

महेक फातेमा ही मेहनती, शिस्तबद्ध आणि ध्येयवादी विद्यार्थिनी असून तिची ही कामगिरी इतर विद्यार्थीसाठी प्रेरणादायी ठरेल. सफलतेचे श्रेय शेख महेकने तिच्या पालकांचे, शिक्षकांचे आणि मिल्लीया कॉलेज मधील अभ्यासपूर्ण वातावरणाला दिले. तिने भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात यश मिळवण्याची महत्त्वाकांक्षा यावेळी व्यक्त केली. या उल्लेखनीय यशाबद्दल शेख महेक फातेमा हिला सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण बाधित होणार असल्याने

## वनविभागाला गायरान जमिन देण्यास महाजनवाडीकरांचा विरोध :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ लिंबागणेश

बीड तालुक्यातील महाजनवाडी ग्रामपंचायत अंतर्गत २५ वर्षांपासून झाडे लाऊन जोपासलेली व संपूर्ण गावाची पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण क्षेत्र बाधित होणार असल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी काळु नदीवरील नियोजित प्रकल्पांमधील वन जमिनीच्या बदल्यात बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील ४० हेक्टर जमिन वनविभागाच्या ताब्यात देण्याचे आदेश काढले असुन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तशा हालचाली सुरू केल्या असुन महाजनवाडी ग्रामस्थांनी एकमुखाने ठराव घेऊन विरोध दर्शविला असुन तसे जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिले असुन गावकरी आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी,माजी सरपंच दत्ता घरत, तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे व ग्रामस्थांनी सांगितले आहे.





महसूल व वनविभाग शासन परिपत्रक दि.२८.०५.२०१० अन्वये ज्या प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केलेले आहेत.त्या प्रयोजनासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यापुर्वी ग्रामसभेचा संमतीदर्शक ठराव असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी असे नमूद केले आहे. ग्रामपंचायतने तसा कोणताही संमतीदर्शक ठराव दिलेला नाही. गावाने २५ वर्षांपासून कोणतेही अतिक्रमण न होऊ देता झाडांची लागवड करून जोपासल्याने सामाजिक वनीकरण विभागाकडून २ वेळेस राज्यस्तरीय पुरस्कार गावाला मिळाले आहेत. गेल्यावर्षी सामाजिक वनीकरण विभागामार्फत ३० हजार झाडांची लागवड केली असुन पुढच्या वर्षी ते ग्रामपंचायतीच्या ताब्यात मिळणार आहे. ग्रामस्थांनी बैठकीत एकमुखाने वनविभागाच्या ताब्यात जमीन देण्यास विरोध केला असुन दि.२३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांना ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने लेखी निवेदन दिले असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.

गावची लोकसंख्या २५०० च्या आसपास असुन गाव आणि वस्त्यांना पाणी पोहोच करणा-या ग्रामीण पाणीपुरवठा करणाऱ्या २ विहिरी,जलयोजना याच गायरान जमिनीवर आहेत. तसेच ४ बोअरवेल तसेच गावाच्या पाणीपुरवठा विहिरीच्या वरच्या बाजूला पाझर तलाव घेतलेला आहे.तसेच आजुबाजुच्या कोंबडवस्ती,तुकाई वस्ती यांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आले असुन वनविभागाच्या ताब्यात जमीन दिल्यास भविष्यात वनविभागाचे नियम पाहता ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागणार असल्याने ग्रामस्थांचा याला विरोध असल्याचे माजी सरपंच दत्ता घरत यांनी सांगितले.

मांजरसुंभा ते पाटोदा रस्त्यावरून महाजनवाडी बोरखेड कडे जाणारा मुख्य रस्ता वनविभागाच्या ताब्यात गेल्यास भविष्यात रस्ता दुरुस्ती व ईतर कामांची अडचण होईल.कारण आमच्या गावाशेजारील फुकेवाडी येथील गेल्या कित्येक वर्षानंतर मंजुर झालेला डांबरीकरण रस्ता वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी अठवल्याने ठेकेदार यांनी अर्धवट रस्ता करून काम सोडून दिले. फुकेवाडी ग्रामस्थांनी वारंवार निवेदने ,आंदोलने करूनही काही उपयोग झाला नाही.भविष्यात तीच वेळ आमच्यावर येऊ शकते त्यामुळे ग्रामस्थांचा विरोध असल्याचे तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे यांनी सांगितले.

# नेकनूर (ता. जी.बीड) गावात मुस्लिम कब्रस्तानावर बुलडोझर; अन्वर हाशमी

## सरपंच लांडगे यांच्या कृतीने वाद निर्माण होण्याची शक्यता

प्रतिनिधी @ नेकनुर



गावातील मुस्लिम कब्रस्तानावर सरपंच लांडगे यांच्या आदेशानुसार बुलडोझर चालवण्यात आल्याने गावात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, ग्रामपंचायत हद्दीत अशा प्रकारची कारवाई कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, सरपंच लांडगे हे दलित व मुस्लिम समाजाच्या मतांवर निवडून आले असूनही, त्यांनी भाजपप्रणीत विचारांप्रमाणे कार्यवाही केल्याचा आरोप स्थानिक कार्यकर्ते करत आहेत. ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असून, या पक्षाने केंद्रात भाजपसोबत युती केली आहे. त्यामुळे भाजपचा स्थानिक निर्णयप्रणालीवर प्रभाव जाणवू लागल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.मुस्लिम कब्रस्तान वक्फ बोर्डच्या अखत्यारीत असून संबंधित मुद्दा सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयीन निर्णय न लागता सरळ कबरी समतल केल्या गेल्याने मुस्लिम समाजात असंतोष आहे. कब्रस्तानातल्या जुन्या कबरीवर बुलडोझर चालवला गेला, हे आमच्या धर्मावरील थेट आक्रमण आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली.या पार्श्वभूमीवर कुल हिंद मजलिसे इत्तहादुल मुस्लिमीनचे नेते अन्वर हाश्मी यांनी संताप व्यक्त करत म्हटले,जर हे कुणाच्या सांगण्यावरून, पुण्याहून बसून ठरवले असेल, तर त्यालाही वेळ आली आहे की जनतेनं जागा दाखवावी. आम्ही वक्फ संपत्ती आणि कब्रस्तानाच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरू. एमआयएम शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढेल!

सय्यद अन्वर अली हाशमी

# चौसाळा येथिल धर्मविर छत्रपती संभाजी महाराज जयंती महोत्सवास मोठया संख्येने उपस्थित रहा-समर्थ शिंदे

प्रतिनिधी @ चौसाळा



प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी बीड तालुक्यातील चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहीती धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष समर्थ शिंदे यांनी दिली आहे.

दि. १४ मे रोजी सकाळी ९-३० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज अभिवादन सोहळा होणार असुन सकाळी ९-४५ वाजता चौसाळा शहरातुन भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन केले असुन ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौसाळा बायपास पंर्यत निघणार आहे सकाळी १०-३० वाजता भव्य सार्वजनिक रक्तदान शिबीराचे आयोजन केले असुन सांयकाळी ५-३० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक हनुमान मंदीर चौसाळा ते लोकराजा छत्रपती शाहू महाराज चौक चौसाळा असी निघणार असुन या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण बेन्जो असणार असुन या मिरवणुकीस मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सवाचे अध्यक्ष समर्थ शिंदे यांनी केले आहे.



# मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुभद्रा खेत्री यांची निवड

प्रतिनिधी @ माजलगांव

माजलगांव तालुक्यातील मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सुभद्रा अंगदराव खेत्री यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली. मोठेवाडी ग्राम पंचायतीच्या सरपंच सत्यभामा मारोती दळवी ह्या अपात्र झाल्या मुळे त्यांच्या रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी सुभद्रा खेत्री यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पारडकर व ग्राम विकास अधिकारी बिभीषण डोरेले यांनी सुभद्रा खेत्री यांची बिनविरोध निवड जाहीर केली.यावेळी माजी सरपंच अविनाश गोंडे, मा. चेअरमण अशोक पास्टे, राजाभाऊ पास्टे, अंगदराव खेत्री,दत्तात्रय चव्हाण, अशोक रासवे, शाम गिरी, आकाश रासवे, दत्तात्रय तपसे, राहुल सुरवसे,जालिंदर खेत्री,भगवान रोकडे, ॲड. पांडुरंग गोंडे, चक्रधर हिवरकर,गजानन गोंडे, संतोष खेत्री व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच

# स्वामी विवेकानंद शाळेची १०० टक्के निकालासह उज्वल यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी @ केज

जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित,स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेतील विद्यार्थ्यांनी मार्च२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.बोर्ड परिक्षे मध्ये घवघवीत यश संपादन केले.या शाळेचे विद्यार्थी कु.चाटेसमीक्षा सचिन,सय्यद जोया फातेमा जुबेर चि.मुंडे सुरज भाऊराव या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० टक्के गुण संपादन करून शाळेतून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला.कु. डोईफोडे शालिनी प्रकाश,तांबारे वैष्णवी चंद्रशेखर,कदमशंभूराजे भागवतराव ९९.६० टक्के गुण मिळवून द्वितीय तर कु.शिंदे शाश्वती पुरुषोत्तम ९९.४० टक्के गुण मिळवून शाळेतुन तृतीय आली.या परीक्षेसएकूण २३३ विद्यार्थी बसले होते.तेंव्हा शाळेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असुन विशेष प्राविण्यासह २२४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.प्रथम श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणारे एकूण १२८ विद्यार्थी आहेत.शाळेतील ९८ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविलेले विद्यार्थी-हरणमारे शाहिद सय्यद ९९.२०,भुसारे समीक्षा प्रचंड ९८.८०,चाटे प्रथमेश महादेव ९८.८०केदार ओमकारदत्तात्रय ९८.८०,कांबळे पूर्वी व्यंकट ९८.६०,गायके आकांक्षा रत्नाकर ९८.४०,सत्वधर हर्षा दत्ता ९८.४०,काटकर मानसी रामभाऊ९८.२०नेहरकर भक्ती विनायक ९८.२०,मुंडे श्रावणी अनिल ९८.२०,हिरवे प्रज्वल





बाबासाहेब ९८.००,काळे वेदिका वैजनाथ ९८.०० वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार,सचिव जी. बी.गदळे,सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजिलोद्दिन काजी,विलास जोशी, नारायण अण्णा अंधारे, संदीप इंगळे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे स्वयंअर्थ सहाय्यीत शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत घाडगे, मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्रा.वि चे मु.अ.वसंत शितोळे, प्राचार्य शंकर भैरट तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाटोद्यात बुद्ध जयंती निमित्त शांतता,समता आणि करुणेचा जागर

## भीमनगर बुद्ध विहारात पंचशील ध्वजारोहण, शांततेत मिरवणूक व सामूहिक पूजापाठाचे आयोजन

प्रतिनिधी @ पाटोदा

जगाला जर शांतता हवी असेल तर बुद्धाचे तत्व स्वीकारावे लागतील... युद्धाने कटूता वाढते तर बुद्धाने प्रेम वाढते, या विचारांचा जागर करत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पाटोदा शहरात अत्यंत शांततेत,भक्तिभावाने आणि सामाजिक सलोख्याने साजरी करण्यात आली.या निमित्ताने भीमनगर येथील बुद्ध विहारात सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. पंचशील ध्वज हा समतेचा, शांततेचा आणि करुणेचा प्रतीक असून, याच्या माध्यमातून तथागतांच्या शिकवणीचा प्रसार करण्यात आला. ध्वजारोहणानंतर विहारात भगवान बुद्धांच्या प्रतिमेची विधीवत पूजा पार पडली.यानंतर बुद्ध मूर्तीची भव्य शांततेत मिरवणूक पाटोदा शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत विविध वयोगटातील बौद्ध अनुयायी, महिला, तरुण, बालगोपाळ यांनी सहभाग घेतला. डोक्यावर पंचशील ध्वज, हातात घोषवाक्यांचे फलक आणि डॉल-ताशांच्या गजरात मिरवणूक शहरातून मार्गस्थ झाली. जय भीम च्या घोषणांनी शहराचे वातावरण भारावून गेले होते.

शहरातील नागरिकांनी मिरवणुकीचे विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत केले. या शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या मिरवणुकीमुळे बौद्ध अनुयायांचे संघटन, संस्कृतीप्रेम आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली.मिरवणुकीनंतर बुद्ध



विहारात सामूहिक पूजापाठ पार पडला. विशेष पूजेनंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी संयोजन केले.बुद्ध पौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो समतेचा, करुणेचा आणि शांततेचा जागर करणारा दिवस आहे. या निमित्ताने पाटोदा शहराने तथागतांच्या विचारांचा प्रसार करत अनुकरणीय आदर्श घालून दिला.



# वसंतदादा पाटील महाविद्यालयातर्फे वन्य पशु-पक्ष्यांना चारा वितरण

प्रतिनिधी @ पाटोदा

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील 'चंपारण्य ग्रीन क्लब' व प्राणिशास्त्र विभागामार्फत १२ मे रोजी वन्यजीव प्रगणना दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील नायगाव मयूर अभयारण्यात वन्य पशु-पक्ष्यांसाठी चारा वितरण करण्यात आला.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य आबासाहेब हांगे, चंपारण्य ग्रीन क्लबचे समन्वयक प्रो. महादेव काळे यांच्यासह सर्पराज्ञी संस्थेचे सर्पमित्र सिद्धार्थ सोनवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल सांगुळे, वनपाल बी. एम. बागवान, वनरक्षक बद्रीनाथ परजने, मिसाळ, माने, सौ. शेळके व इतर कर्मचारी उपस्थित होते.या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातर्फे ५५ किग्रॅ तांदूळ, १० किग्रॅ व ५ किग्रॅ गहू अभयारण्यातील वन्य पशु-पक्ष्यांसाठी चारा म्हणून उपलब्ध करून देण्यात आला.

# शालांत परीक्षेत गोदावरी कुंकूलोळ यो.कन्या विद्यालयाचे घवघवीत यश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालयाचा एकूण निकाल ९८.५९ टक्के इतका लागला आहे. विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश प्राप्त केले असून ५३ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण घेऊन सन्मानाचे स्थान प्राप्त केले आहे. विद्यालयातील पायल ज्ञानोबा माले हिने ९८. ४० टक्के गुण घेऊन विद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे ईश्वरी अभिजित देशपांडे हिने ९८.०० टक्के गुण घेऊन व्दितीय तर अनुष्का उमेश बारसे व नंदिनी भगवंत पवार या दोन विद्यार्थिनींनी ९७.६० टक्के गुण प्राप्त करून विभागुन तृतीय क्रमांक मिळविला आहे. विद्यालयातील २८४ विद्यार्थिनी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाल्या त्यातील २८० विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत

विशेष प्राविण्यासह १७२,प्रथमश्रेणी ६६, व्दितीय श्रेणी २६ संस्कृत विषयात १७ विद्यार्थिनींनी शंभर गुण घेतले आहेत या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन यो.शि.संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे,अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर पदाधिकारी जी.बी.व्यास,ॲड. जगदीश चौसाळकर,कमलाकर चौसाळकर,डॉ.शैलेश वैद्य,भीमाशंकर शेटे, जयश्री देशपांडे,ॲड. कल्याणी विर्धे,मुख्याध्यापिका एम.एस.कुलकर्णी, शालेय पदाधिकारी, शिक्षिका,शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी आदींनी केले आहे.

# निद्रानाशामुळे हृदयरोगाची शक्यता- डॉ.जगदीश टेकाळे

बीड : निद्रानाशामुळे अनेक शारीरिक व्याधी उत्पन्न होतात. नुकत्याच झालेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की अपुऱ्या झोपेमुळे अनेक आरोग्य समस्यांसह हृदयविकाराचा त्रासही होऊ शकतो. वयानुसार झोपेची गरज बदलते. ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रौढांना फक्त सहा ते सात तास रात्रीची झोप पुरेशी असते. तरुणांना सर्वात जास्त किमान नऊ तास झोपेची गरज असते आणि लहान मुलांना त्याहीपेक्षा जास्त गरज असू शकते.

निद्रानाशाची तक्रार असलेल्यांना उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका असण्याची शक्यता जास्त असते असे त्यांच्या टीमला लक्षात आले, यावर त्यांनी काही उपाय सुचवले आहेत. त्यामध्ये कॅफीन,अल्कोहोल कमी करणे, धूम्रपान सोडणे, नियमित व्यायाम करणे या बाबींचा समावेश आहे. रात्री उशिरा जेवू नका किंवा जास्त खाऊ नका, अशीदेखील शिफारस केली आहे.

त्याचबरोबर संशोधकांनी झोपेसाठी काही नियम सांगितले आहेत. त्यामध्ये आपली उठण्याची वेळ निश्चित करा. पलंगाचा वापर झोपेव्यतिरिक्त अन्य कामासाठी करू नका. जेव्हा झोप येईल तेव्हाच झोपायला जा. रात्रीच्या झोपेची भरपाई करण्यासाठी दिवसा झोपू नका. यामुळे निद्रानाश काही प्रमाणात कमी करता येऊ शकतो. अधिक त्रास असल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२









## गुणवंतांचे अभिनंदन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा प्रमाण परीक्षा अर्थात दहावीच्या परीक्षेत यश मिळवलेल्या सर्व गुणवंतांचे मनपूर्वक अभिनंदन आणि पुढील शैक्षणिक वाटचालीस दत्ता कराड दै.मराठवाडा दर्शन न्युज परिवार तर्फे खूप खूप शुभेच्छा..

# जिल्ह्यातील जनतेच्या काळजीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज !

प्रतिनिधी @ बीड

सध्या राज्यात अनेक ठिकाणी विजा चमकणे पाऊस यामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता आहे बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना विजा पडत असताना स्वतःची काळजी घ्या असे आवाहन केले आहे. आकस्मिक पावसामुळे अनेकदा नाले ओढे यांना अचानक पूर येऊ शकतो त्यामुळे स्वतःची तसेच गुराढोरांची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे आणि सोबतच विजा कडाडत असल्यामुळे नागरिकांची भंबेरी उडते अशावेळी स्वतःची आणि पशुसंपदेची कशाप्रकारे काळजी घ्यावी याबद्दल प्रशासनाने सविस्तर माहिती दिली आहे. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविल्यानुसार वीजा पडताना सुरक्षित राहण्यासाठी बाहेर असाल तर सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या, झाडाखाली किंवा उंच ठिकाणी थांबणे टाळा, घरात असाल तर खिडक्या आणि दारांपासून दूर राहा आणि पाणी किंवा विद्युत उपकरणांपासूनही दूर रहा असे आवाहन शेळके यांनी केले आहे.

प्रशासनाने जारी केलेल्या या सूचनानुसार जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील जनतेची काळजी घेतली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळ्या सूचना देण्यात आल्या असून, नागरिकांनी काय काय काळजी घ्यावी याबाबत सूचित करण्यात आले आहे. विजेच्या धोक्यापासून बचाव करण्यासाठी खालील गोष्टींची काळजी घ्या. बाहेर असल्यास विजा चमकत असल्यास लगेच सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या बंद इमारत घर किंवा बंदिस्त जागा यांसारखी ठिकाणे सुरक्षित मानली जातात यावेळी उंच ठिकाणी थांबणे टाळा उंच ठिकाणी जसे की झाड विद्युत पोल किंवा पत्र्याचे शेड येथे थांबणे टाळा धातूच्या वस्तूंपासून दूर राहा छत्री चाकू किंवा भांडे यांसारख्या धातूच्या वस्तूंपासून दूर राहा गटात उभे राहणे टाळा. इतर लोकांपासून योग्य अंतर ठेवा आणि गटात उभे राहणे टाळा पायाव्यतिरिक्त इतर भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्या शेतात आश्रय घेतल्यास पायाखाली कोरडे लाकूड प्लास्टिक किंवा इतर साहित्य ठेवा जेणेकरून शरीराचा कोणताही भाग जमिनीला स्पर्श करणार नाही घरात असल्यास खिडक्या आणि दारांपासून दूर रहा पाण्याशी संबंधित काम करू नका सिंक , बाथटब किंवा नळाजवळ काम करणे टाळा विद्युत उपकरणे सुरु करू नका फोन संगणक किंवा इतर विद्युत उपकरणे सुरु करू नका विजा चमकत असताना मोबाईल फोन आणि इंटरनेटचा वापर टाळा वादळात एसी चालू ठेवणे टाळा शेतामध्ये सुरक्षित ठिकाण ( उदा. शेड , कँप ) शोधा झाडाखाली उभे राहणे टाळा तारेचे कुंपण विजेला आकर्षित करते त्यामुळे ते टाळा पायाखाली कोरडे साहित्य ठेवा उदा कोरडे लाकूड प्लास्टिक किंवा इतर साहित्य पायाखाली ठेवा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविल्यानुसार पावसाळ्यात हवामान विभागामार्फत विविध अलर्ट दिले जातात

## विडा येथिल श्री.हनुमान विद्यालयाची निकालाची परंपरा यंदाही कायम

### कु.गायके अमृता ९३.८०% गुण घेऊन प्रथम तर कु.गुरव रेणूश्रीने ९३.६०% गुण घेत पटकावला दूतिय क्रमांक..





केज / प्रतिनिधी

'इडा शिक्षण संस्था,इडा संचलित श्री.हनुमान विद्यालय विडा ता.केज जि.बीड विद्यालयाने दरवर्षाप्रमाणे उज्वल यशाची परंपरा कायम राखली आसून इयत्ता दहावीच्या परिक्षेत शाळेचा १०० % लागला आहे.

विडा येथिल श्री.हनूमान विद्यालयाचा यावर्षी १००% निकाल लागला असून शाळेतील ६१ विद्याथ्यांनी परिक्षा दिली होती.त्यापैकी ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उतिर्ण झाले आहेत.तर ६ विद्यार्थी प्रथम श्रेणीतून पास झाले आहेत.शाळेतुन कु.गायके अमृता बळीराम या विद्यार्थिनिने ९३.८०% गुण घेऊन (प्रथम) क्रमांक पटकावला असून कु.गुरव रेणुश्री बळीराम ९३.६०% (दूतिय),कु.पटाईत सारिका राजेंद्र ९३.४०% (तृतिय),कु.ढोबळे समृध्दी अनिल ९३% व कदम हरिकेश सतिश ९३% गुण घेत चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

निकालाच्या उज्वल यशाबद्दल,लोकनेते आदरणीय श्री.ज्ञानोबाराव देशमुख (विडेकर गुरुजी),धैर्यशील भाऊ देशमुख, प्राचार्या श्रीमती चव्हाण व्ही.आर.सर्व प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विडा व विडा परिसरातील पालक यांनी कौतुक केले आसून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या आसून सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## एकल महिलांच्या प्रश्नावर राज्य सरकार सकारात्मक :- बाजीराव ढाकणे

बीड प्रतिनिधी :- जेष्ठ समाजसेवक हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली साऊ एकल महिला समितीचे राज्यभरातील कार्यकर्ते मागिल पाच वर्षांपासून महाराष्ट्र राज्यातील एकल महिलांच्या विविध प्रश्नावर राज्य सरकार बरोबर पत्रव्यवहार, बैठका व निवेदनाद्वारे झगडत असुन त्या प्रत्येक गोष्टी सरकार कडून सुरू करून घेण्यात यशस्वी होत आहे असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी मुंबईत मंत्रालयात एकल महिलांच्या प्रश्नावर महिला व बालकल्याण मंत्री नामदार आदितीताई तटकरे यांनी एकल महिलांच्या प्रश्नावर बैठक घेतली. या बैठकीस आमच्या साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी व अभ्यासू कार्यकर्ते मिलिंदकुमार साळवे सहभागी झाले होते.

या बैठकीत एकल महिलांचे सर्वेक्षण करणे, बालसंगोपन योजनेचे पैसे दर महिन्याला नियमित मिळणे,तालुका स्तरावर या महिलांसाठी समित्या तयार करून सक्रीय करणे, एकल महिलांसाठी कमी व्याजदराची व्यक्तिगत कर्ज योजना तयार करणे असे अनेक मुद्दे मांडले. त्याला सन्माननीय मंत्री व अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्याबद्दल राज्य सरकार व संबंधित खात्याचे मंत्री आणि अधिकारी यांचे साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी आभार मानले आहेत.


ज्ञान हेच सामर्थ्य

नों.क्र.महा.२५६/एफ२२२०७

महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण संशोधन परिषद, बीड संलग्न

श्री संत उमाजी बाबा सेवाभावी संस्था, संचलित

ज्ञानसागर गुरुकुल, बीड



* १ ली ते १२ वी सेमी,इंग्रजी,मराठी विद्यार्थ्यांना प्रवेश
* सुसज्ज भव्य इमारतीत निवास व भोजन व्यवस्था
* विद्यार्थ्यांसाठी क्लासेसची सोय
* मुलांना शाळेत जाण्यासाठी बसची व्यवस्था
* अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय
* शेतकऱ्यांच्या मुलांसाठी अत्याल्प खर्चात शिक्षण

आपला प्रवेश आपल्या मुलांचे भविष्य घडवू शकतो, आवश्यक आमच्या गुरुकुलला भेट द्या.

* संचालक-सानप जी.एन

9075254000, 7774959207, 8830900252

पत्ताः पाठक मंगलकार्यालयाच्या पाठीमागे, कल्याण नगर, नगर रोड, बीड


# जगाला बुद्धांच्या तत्वज्ञानाची गरज

### पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे प्रतिपादन

## शिवणीत थायलंडच्या बुद्ध मूर्तीची झाली प्रतिष्ठापणा



बीड/प्रतिनिधी

अवघे जग बौद्ध धम्माकडे वैज्ञानिक दृष्टिकोणातुन पाहते. त्यामुळे मानवी जीवन जगत असतात तथागत गौतम बुद्धाने दिलेले तत्वज्ञान अंगिकारले पाहिजे.असे मनोगत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार (दि.१२) मे रोजी तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपस्थित बौद्ध जनसमुदयास संबोधित करताना नवनीत काँवत बोलत होते.

यावेळी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड तथा बुद्ध जयंती महोत्सवाचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो, कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त महाथेरो तर अध्यक्ष म्हणून डॉ.भिक्खु इंदवंस्स महाथेरो, प्रमुख उपस्थितीत भिक्खु चंद्रमुणी होते.प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून सीईओ आदित्य जीवने, नायब तहसीलदार सुहास हजारे, अधीक्षक अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे, इंजि बी. के. अदमाने उपस्थित होते.

पुढे बोलतांना नवनीत काँवत म्हणाले की, बुद्धाने या जगाला प्रज्ञा,शील, करुणा शिकविली. चक्रवर्ती सम्राट अशोक राजाने बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा जगात प्रचार आणि प्रसार केला. शिल्प आणि शिलालेखाच्या माध्यमातून बुद्धाचे तत्त्वज्ञान या जगात कायम जिवंत आहे आणि जिवंत राहील. भारत हा बुद्धाची जन्मभूमी आहे म्हणून आपल्या देशाची जगात ओळख आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुर येथे बौद्ध धम्म दीक्षा देऊन बुद्धांचे तत्त्वज्ञान पुन्हा आपल्याला अवगत करून दिले आहे. आज शिवनी येथे तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. येणाऱ्या काळात या पुण्यभूमीतून तथागताच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार आणि प्रचार होईल असे मनोगत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले तर सूत्रसंचालन दीपक भालेराव यांनी केले. यावेळी प्रा.डॉ. मनोहर सिरसाट यांच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बुद्ध महोत्सवाला बीड जिल्ह्यासह राज्यभरातून बौद्ध उपासक-उपासिका, आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.

बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. सदरील मूर्ती थायलंड या देशातून आणण्यात आली आहे. बुद्ध महोत्सवाचे संयोजक पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या धम्म चळवळीतून ही मूर्ती बसविण्यात आलेली आहे.



बीड शहरातुन निघाली बुद्ध प्रतिमेची धम्म रॅली

### धम्म रॅलीने वेधले लक्ष

तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची भव्य धम्मरॅली काढण्यात आली. या धम्म रॅलीत बौद्ध भिक्खू, बौद्ध उपासक उपासिका, आंबेडकरी जनता पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाली होती. त्यामुळे या रॅलीन बीड शहराचे लक्ष वेधून घेतले होते.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने






डॉ संगिता पिंगळे
बीड

खर म्हणजे दुःख हेच सुख माना म्हणजे ताप होणार नाही

खर म्हणजे दुःख हेच सुख माना म्हणजे ताप होणार नाही असे गुरुजी म्हणाले. या सृष्टीत कुठल्याही क्रियेला विरुद्ध प्रतिक्रिया आहे, असा नियमच आहे. बालपणी खूप जास्त हसले की कुणीतरी म्हणायचे,,जास्त हसू नको,तेवढे रडावे लागेल. तेंव्हा हे गणित कळत नव्हते. तोही काही अगदी नियमच आहे असे नाही तरी परंतु दोन बाजू आहेतच त्यामुळे दोन्ही महत्त्वाच्या आहेत. अंधार आहे म्हणून सूर्य अन त्याचा प्रकाश मोलाचा आहे. मरण आहे म्हणुन जगण्याची किम्मत आहे तसेच दुःख आहे म्हणून सुखाची किम्मत आहे. तसे नसतेच तर ही सृष्टी एककल्ली कशी टिकली असती अन टिकली असती तर रसपूर्ण नसती, निव्वळ तेच ते अन तेच ते. त्यामुळे गुरुजी दुःखाचाही तेवढ्याच प्रमाणात तेवढ्याच प्रेमाने स्वीकार करतात. दुःख देणार्यालाही सुख मिळावे म्हणुन पराकाष्ठा करतात कारण इथे सर्वांना सुख पाहिजे असते. पण इतिहास हा दुःख अनुभवल्याशिवाय घडत नसतो. सुखाचे तर सुख आहेच पण गुरुजी तुम्ही आम्हाला शिष्य म्हणुन स्वीकारले अन दुःख हे दुःख वाटत नाही कारण सुख झाले दुःखाचे. थँक्स गुरुजी आपला नित्य जयजयकार असो.

## केज तालुक्यातील उंदरी येथील पंचशील बुद्ध विहारातत‌थागत भगवान गौतम बुद्धांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील उंदरी येथील पंचशील बुद्ध विहारात दिनांक १२ मे २०२५ रोजी वैशाखी पौर्णिमा, बुद्ध जयंतीच्या मंगल दिनी महाकारूनिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.याकार्यक्रमास भारतीय बौध्द महासभा जिल्हा शाखा,बीड(पुर्व)चे जिल्हा संघटक आणि बौध्दाचार्य आदरणीय आरूण पटेकर, तालुकाध्यक्ष बालासाहेब जोगदंड,शहर अध्यक्ष डॉ.प्रभाकर ठोके, महिला शहर अध्यक्षा सुनिताताई कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे धूप-दिपाणी पुष्पहार अर्पण करून पुजन करून त्रिसरण, पंचशिल, घेण्यात आले त्यानंतर धम्म ध्वजाला समता सैनिक दलाच्या वतीने समता सैनिकांनी मानवंदना दिली.पंचशिल बुध्द विहारात तथागत भगवान बुद्धांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना आदरणीय बौध्दाचार्य आरूणजी पटेकर यांचे हस्ते विधीवत तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.कार्यक्रमास उंदरी येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिका तथा बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्याच प्रमाणे भारतीय बौध्द महासभा शहर व तालुका आणि जिल्हा शाखेचे पदाधिकारी बळीराम सोनवणे,आश्रुबा खरात,भारत ढालमारे,राजु गायकवाड,हिरकणीताई गायकवाड, भारतीय बौध्द महासभा शहर शाखा केजचे संस्कार सचिव चंद्रकांतजी मस्के यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांचे आयोजन उंदरी येथील समस्त गाडे,घोडके, सोनवणे, ठोके परिवाराने केले होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उंदरीचे उपसरपंच सोनवणे साहेब,सितारामजी ठोके, संतोष ठोके, नागसेन ठोके,भगवान घोडके यांच्यासह बौद्ध उपासक-उपासिका आणि युवक यांनी अथक परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## संत आश्रुबा (दादा) गायकवाड यांच्या कृपा आशिर्वादाने मी कितनकार झालो-ह.भ.प. महादेव महाराज पुरी

केज/ प्रतिनिधी

२० व्या शतकातील महान संत आश्रुबा( दादा) गायकवाड, आनंदगांव ता. केज. जि. बीड यांच्या कृपा आशिर्वादामुळेच मी किर्तनकार झालो आणि माझे भाग्य थोर कि,संत आश्रुबा ( दादा) गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त मला कितीनसेवा करण्याची मला संधी मिळाली असे मत कितीन सेवा करताना किर्तनकार महादेव महाराज पुरी यांनी किर्तन सेवा करताना मत व्यक्त केले.

दिनांक १३ मे २०२५ रोजी संत आश्रुबा ( दादा ) गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त किर्तन करताना बोलत होते.

संपूर्ण महाराष्ट्रात दादा महाराज म्हणून त्यांचे नाव होते. निशुल्क किर्तन सेवेतूनआपली वेगळी ओळख संत आश्रुबा ( दादा) गायकवाड यांनी निर्माण केली.

अमाप आणि अफाट शब्द सामर्थ्य व ओघवती भाषा हे त्यांच्या किर्तन सेवेचे एक वैशिष्ट्ये होते.

१९७२ पर्यंत त्यांनी अखंड आणि अविरत किर्तन सेवा केली. संस्कृत,

मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दू, मोडी, पाली अशा ७ भाषा त्यांनी आत्मसात केल्या होत्या. जसा जनसमुदाय तशी भाषा हे त्यांच्या किर्तन सेवेचे दुसरे वैशिष्टे होते.

दादांनी ग्रंथ वाचन, अर्थ सांगणे, प्रवचन करणे, किर्तन करणे हे अध्यात्मिक कार्य करीत असतानाच महिला भजनी मंडळ हि संकल्पना २० व्या शतकात गांवापासून सुरू केली व महाराष्ट्रभर पसरविली.

जगदगुरु संत तुकाराम महाराजांसारखे वैराग्य धारण केले. आधी संसार करावा नेटका दे ब्रीद त्यांनी आयुष्यभर तंतोतंत पाळले.

अवघाची संसार सुखाचा करीन, आनंदे भरील तिन्ही लोक याची प्रचिती त्यांनी दिली.

दादांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित किर्तनाला व इतरही कार्यक्रमात ग्रामस्थ, पंच क्रोशीतील महिला - पुरुष, व महाराष्ट्रातूनही अध्यात्मिक क्षेत्रातील मंडळींचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA).
EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB